**सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे येथे दिनांक १२/०९/२०२२ रोजी मा. संचालकांसमेवत सर्व विभागीय सह संचालक यांच्यासोबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.**

दिनांक १२/०९/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा नवी मुंबई यांच्या समवेत सर्व विभागीय सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्या सोबत आढावा बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. माधव नागरगोजे | मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य |
| २. | श्रीम. शुभांगी माने | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,कोकण विभाग. |
| ३. | श्री.गणेश पाटील | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा पुणे. |
| ४. | श्री.गिरीश देशमुख | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा नाशिक. |
| ५. | श्री.किरणकुमार धोत्रे | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा औरंगाबाद |
| ६. | श्रीम. मोना ठाकूर | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा नागपूर |
| ७. | श्रीम. राजश्री ठोकळ (प्र) | सहसंचालक, संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा नवी मुंबई |
| ८. | श्री.दिपक भिलपवार (प्र.) | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा अमरावती |
| ९. | श्री.प्रताप भोसले | सहायक संचालक (प्र), स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे |

दि. १२/०९/२०२२ रोजी मा. संचालक यांचे अध्यक्षते खालील सर्व सहसंचालकांसमवेत पार पाडलेल्या आढावा बैठकीत चर्चिलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने आढळून आलेल्या सदयस्थितीवर मा. संचालक महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय</th><th>बैठकी मध्ये झालेली चर्चा</th><th>मा. संचालक यांनी दिलेले निर्देश</th><th>समय मर्यादा</th></tr>
<tr><td>१</td><td>लेखापरीक्षणाचे विशिष्ट परिमाण (Quantum of Audit) सन 2021-22 बाबतची रुपरेषा ठरविणे.</td><td>नागपूर विभाग - नगरपालिका व नगरपंचायत लेखापरीक्षणात लेखापरीक्षणाचे विशिष्ट परिमाण (Quantum of Audit) ठरविण्याचे अनुषंगाने सहसंचालक नागपूर यांनी दिनांक ०२/०८/२०२२ रोजी विभागीय स्तरावर नगरपरिषद व नगरपंचायत वार्षिक लेखे प्रमाणिकरणाचे अनुषंगाने Tally या संगणक प्रणालीबाबत सनदी लेखापाल यांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.<br>सदर प्रशिक्षणाचे अनुषंगाने Tally या संगणक प्रणालीव्दारे प्राप्त डाटाचे विश्लेष केले असता सर्व माहिती Excel Sheet मध्ये प्राप्त करुन सदर माहितीचे रक्कमे नुसार Ascending, Descending order चे Filter लावल्यास नगरपरिषद कडून करण्यात आलेल्या खर्चाचे प्रमाणक निहाय माहिती उपलब्ध होऊन रेखांकना मध्ये केवळ सदर प्रमाणक निहाय खर्चाची पडताळणी करावी लागणार असल्याचे सहसंचालक नागपूर यांनी कळविले . त्याकरिता केवळ<br>➢ लेखापरीक्षणाचे सुचना पत्र निर्गमित करतांना Tally चा सर्व डाटा कार्यालयाचे ई-मेल वर मागविणे आवश्यक आहे.<br>➢ Tally च्या प्राप्त माहितीचे बॅकेच्या खाते निहाय ताळमेळाची माहितीची तपासणी करणे आवश्यक आहे.<br>➢ प्रमाणक निहाय फिल्टर लावण्यात येऊन मोठया रकमेची प्रमाणके वेगळे करण्यात येऊन त्या नुसार लेखापरीक्षणाचे नियोजन करुन श्रमदिनाची विभागणी करणे आवश्यक आहे.</td><td>➢ नागपूर विभागाने नगरपालिका, नगरपरिषद व नगरंपचायत लेखापरीक्षणात Tally संगणक प्रणालीचे अनुषंगाने रेखांनाबाबत कार्यवाही करण्यात यावी.<br>➢ नगरपालिका व नगरपंचायतीचे लेखापरीक्षण करतांना खर्चाची मर्यादा खालील प्रमाणे ठरविण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतील.<br><table><tr><td>अ वर्ग नगरपालिका</td><td>रु. १० लाख वरील खर्च</td></tr><tr><td>ब वर्ग नगरपालिका</td><td>रु. ७ लाख वरील खर्च</td></tr><tr><td>क वर्ग नगरपालिका</td><td>रु. ५ लाख वरील खर्च</td></tr><tr><td>नगरपंचायत</td><td>रु ३ लाख वरील खर्च</td></tr></table></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>महालेखाकार, मुंबई यांच्या लेखापरीक्षण पध्दतीप्रमाणे Entry Conference आणि Exit Conference असे लेखापरीक्षणाचे टप्पे ठरविणे.</td><td><u>Entry व Exit Conference:-</u><br>➢ Entry Conference व Exit Conference घेण्यात आल्यास लेखापरीक्षण संस्था तसेच लेखापरीक्षण विभागात सकारात्मक वातावरण निर्माण होऊन लेखापरीक्षण गुणवत्तापुर्ण व दर्जेदाररित्या पुर्ण करण्यास मदत होईल.<br>Entry Conference मध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात यावा.</td><td>* प्रारुप अहवाल झाल्यानंतर पुढील लेखापरीक्षण सुरु करावे. श्रमदिन संपल्यानंतर वाढीव दोन दिवस घेऊन प्रारुप अहवाल वाचन करुनच बाहेर पडावे. याबाबत परिपत्रक काढावे.<br>* हाफ मार्जिन मेमो मेन्स प्रणालीवर अनिवार्य करण्यात आले आहे. - ऑन लाईन मेमो देणे.<br>* जसे जसे परिच्छेद तयार होतात तसे संस्थेस दिले पाहिजेत शेवटी एकत्रीत देऊ नयेत. सहायक संचालक यांनी यावर नियंत्रण ठेवावे.</td><td></td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १. लेखापरीक्षणाचा कालावधी (श्रमदिनाची) व लेखापरीक्षण वर्ष.<br>२. लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेल्या अभिलेख्याची माहिती विवरणपत्रासह देणे.<br>३. मागील वेळेस काही वेळा लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन दिले जात नाहीत अशा बाबी सदर चर्चेच्या वेळी निदर्शनास आणने. त्यामुळे लेखापरिक्षणास अभिलेखे प्राप्त न होण्याचे प्रवृत्तीस आळा बसण्यास मदत होईल.<br>४. लेखापरीक्षण कालावधीत वारंवार मागणी करुनही उपलब्ध करुन न देण्यात आलेले अभिलेखे लेखापरीक्षणाच्या शेवटच्या दिवशी तपासून दिले जाणार नाहीत याची जाणीव Entry Confernce मध्ये संबंधित विभागास करुन देण्यात यावी.<br>५. चर्चेअंती इतिवृत्त निर्गमित होणे आवश्यक आहे.<br><br>➢ Exit Conference मध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात यावा.<br>१. लेखापरीक्षणा दरम्यान निर्गमित अर्धसमासपत्रे व त्यानुसार प्राप्त अनुपालने यावर चर्चा करण्यात यावी.<br>२. प्रारुप परिच्छेदांच्या अनुषंगाने चर्चा या मध्ये संबंधित संस्थेमधील अनियमितता / त्रुटयाबाबत चर्चा करण्यात यावी.<br>३. चर्चेअंती लेखापरीक्षण पुर्ण झाल्याचे अनुषंगाने इतिवृत्त निर्गमित होऊन त्याचा समावेश अहवालात होणे आवश्यक आहे.<br>करिता लेखापरिक्षणाचे वेळी Entry व Exit Conference होणे आवश्यक आहे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | <u>L-CAP प्रणालीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.</u><br>1) वसुलपात्र रकमा अंतर्भूत असणारे परिच्छेद प्रत्यक्ष कागदपत्रांची पडताळणी करुन तपासणे | | ➢ L-CAP वरील अनुपालनासोबत पुराव्यादाखल अभिलेख्याच्या स्कॅन प्रती जोडण्यात येत असल्याने तंत्रज्ञानाचा वापर करुन मुळ अभिलेख्यामध्ये बदल करुन स्कॅन प्रती सादर केल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रक्कम वसूल करुन पुराव्यादाखल चलानची प्रतीची स्कॅन प्रत L-CAP वरील अनुपालनासोबत जोडलेली असून अनुपालन समाधानकारक असेल अशावेळी "अनुपालनासोबत जोडण्यात आलेल्या चलानच्या मुळ प्रती तपासणीकरीता सादर करण्यात याव्यात" असा शेरा नमुद करुन परिच्छेद कायम ठेवल्याचे पत्र निर्गमीत करावे. संबंधीत विभागाद्वारे चलानच्या मुळ प्रती तपासणीकरीता सादर केल्यानंतर सदर चलानची तपासणी करुन प्रती योग्य असल्यास सदर परिच्छेद वगळल्याचे पत्र निर्गमीत करावे. | |
| | २) अनियमितते संदर्भातील परिच्छेद L-CAP प्रणालीद्वारे Online तपासणे | | ➢ सदर अनुपालनासोबत जोडण्यात आलेल्या जोडपत्रांच्या स्कॅन प्रतींची तपासणी करुन समर्पक व परिपूर्ण अनुपालन सादर करण्यात आल्याची खात्री होईल. तेव्हा सदर परिच्छेद वगळल्याचे पत्र निर्गमीत करावे. | |
| | L-CAP द्वारे मेन्स प्रणालीवर प्राप्त अनुपालनांची पडताळणी करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी | ➢ L-CAP प्रणालीद्वारे मेन्स प्रणलीवर प्राप्त अनुपालनांवर कार्यवाही करतांना येणाऱ्या तांत्रि अडचणींबाबत सहसंचालक नागपूर यांनी पुढील बाबी नमुद केल्या. सद्यस्थितीत L-CAP द्वारे प्राप्त अनुपालनांची पडताळणी ऑनलाईन पध्दतीने करतांना मुळ परिच्छेदाची PDF, विभागाचे अनुपालन तथा तपासणी अधिकाऱ्यांचे अभिप्राय व जोडपत्र अशा तीन वेगवेगळया विंडोमध्ये एकाच वेळी अवलोकन करुन तपासणी करावी लागत असल्याने तपासणीकरीता अडचणी येतात. त्याऐवजी परिच्छेद क्र., मुळ परिच्छेद, विभागाचे अनुपालन व तपासणी/पुनर्विलोकन अधिकाऱ्याचे अभिप्राय, जोडपत्र (hyperlinks स्वरुपात) यांचे ऑफलाईन अनुपालनाकरीता वापरण्यात येत असलेल्या आडव्या नमुन्यामध्ये एकत्रितकरण (Integration) करुन एकाच विंडोमध्ये उपलब्ध करुन सदर माहीती PDF मध्ये View/Download करीता प्रणालीद्वारे उपलब्ध करुन द्यावी. जेणेकरुन मुळ परिच्छेदाचा मसुदा, | ➢ सहसंचालक नागपूर यांचेद्वारे प्रस्तावीत करण्यात आलेल्या सुधारणा मेन्स प्रणालीमध्ये करण्याबाबत सहसंचालक यांनी कार्यवाही करावी. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखापरीक्षण संस्थेद्वारे सादर अनुपालन व तपासणी/पुनर्विलोकन अधिकारी यांचे अभिप्राय एकाच वेळी अवलोकनार्थ उपलब्ध होऊन वारंवार वेगवेगळया विंडोमध्ये जाऊन होणारा वेळेचा अपव्यय टाळता येऊन ऑनलाईन पध्दतीने प्राप्त अनुपालनांची अधिक जलदगतीने तपासणी करुन परिच्छेदांचा जलदगतीने निपटारा करता येणे शक्य होईल. | | |
| ४ | विशेष लेखापरीक्षण एकुण प्रकरणे सद्यस्थिती. | *प्रत्यक्ष स्पॉट वर जाऊन विशेष लेखापरीक्षणा बाबत अधिकार देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.<br>* इतर राज्यामध्ये या संदर्भात काय कार्यपद्धती आहे. या बाबत विचारणा करण्याकरीता सूचना दिल्या. | ➢ विशेष लेखापरीक्षणाची मागणी ज्या जिल्हयातील आहे. त्या जिल्हातील लेखापरीक्षक वगळून इतर जिल्हयातील लेखापरीक्षकांची नियुक्ती सदर विशेष लेखापरीक्षणाकरिता करण्यात यावी.<br>● सर्व संस्थांच्या विशेष लेखापरीक्षणाच्या बाबतीत विभागीय सहसंचालक यांनी मार्गदर्शिका तयार करावी. | |
| ५ | परिच्छेदामध्ये तात्पुरती अमान्य, अंतिम अमान्य, आक्षेपाधिन, वसुलपात्र रकमांचा अंतर्भाव करणे अथवा बदल करणे | *आक्षेपाधीन रकमा तसेच तात्पुरती अमान्य रक्कमा लेखापरीक्षण अहवालामध्ये दर्शविण्यात येवू नयेत.<br>* नगरपालिका / नगरपंचायतींच्या बाबतही वसुलपात्र रक्कमांची नोंद घ्यावी.<br>* अभिलेखे उपलब्ध न झाल्याबाबतची प्रकरणे ०९ ब मध्ये अंतर्भुत करावीत. | लेखापरीक्षण अहवालामध्ये शासन निधीसाठी अंतिम अमान्य रक्कम दर्शवावी व स्वनिधीसाठी वसूलपात्र रक्कम दर्शवावी | |
| ६ | सर्व विभागांची वर्षनिहाय व संस्थानिहाय भार-अधिभार प्रकरणांची सद्यस्थिती | * प्रत्येक जिल्हयाने जिल्हा परिषद / पंचायत समिती / नगरपालिका / नगरपंचायती संदर्भात आढावा घेऊन सन २०१३-२०१४ पासून भार अधिभार प्रकरणे भाग -१ मध्ये घेणेबाबत सूचना दिल्या.<br>*भार अधिभार प्रकरणे सन २०१३-२०१४ पासून विचारात घेऊन लेखापरीक्षण अहवालाच्या भाग -१ मध्ये दर्शविण्याबाबत चर्चा झाली. | *भार अधिभार बाबतची प्रकरणे लेखापरीक्षण अहवालाच्या भाग -१ मध्ये दाखवणे बाबत. याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात येईल. | |
| ७ | जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती, संकीर्ण संस्था तसेच महानगरपालिका यांचे | | * तपासणी सूची अद्यावत करणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षणाचे प्रमाण विचारात घेवून तपासणी सूची अद्ययावत करणे. | | | |
| ८ | नगरपालिका, नगरपंचायती व शिक्षण मंडळाचे अप्राप्त अहवाल. | | * लेखापरीक्षण अहवाल प्रलंबित असल्यास नोटीस काढणे.<br>* जे लेखापरीक्षण अहवाल प्रलंबित आहेत. ते अहवाल साठ (६०) दिवसात प्रसिध्द होणे आवश्यक आहे.<br>* नगरपालिकांचे देखील अहवाल विहित मुदतीत प्रसिध्द होणे आवश्यक आहे. जे अहवाल प्रलंबित आहेत त्यांची कारणमिमांसा विचारात घ्यावी.<br>*लेखापरीक्षक निहाय आढावा घ्यावा. व नेमकी कारणमिमांसा सहसंचालक यांच्याकडे द्यावी. सर्व विभागीय सहसंचालक यांनी प्रत्यक्ष वस्तुस्थितीच लेखापरीक्षकांच्या अडचणीचा विचार करुन प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतचा उहापोह करावा. याप्रमाणे विहित मुदतीत अहवाल सादर केले नसतील तर पुढील लेखापरीक्षण देण्यात येऊ नये. याबाबत संचालनालयास नियमसंगत कार्यवाही करणे भाग पडेल.<br>सहायक संचालक यांनी प्रलंबितेबाबत मासिक बैठकीमध्ये प्रत्यक्ष आढावा घ्यावा व त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करावा. | |
| ९ | नव्याने लेखापरीक्षणाबाबत आलेल्या संदर्भाबाबत लेखापरीक्षणाचा आवाका, लेखापरीक्षणाचे निकष व व्याप्ती ठरविणे, तसेच मनुष्यदिन निश्चिती (पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) | | ➢ पुणे महानगर महानगर विकास प्राधिकरणाचे धर्तीवर नागपूर महानगर विकास प्राधिकरणाचे लेखापरीक्षणाचे आदेश निर्गमित करण्यात येतील. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी तसेच उत्कृष्ट लेखापरीक्षक यांना प्रोत्साहन देण्यासाठी चर्चा करणे. उत्कृष्ट कामासाठी प्रमाणपत्र देणे. | | ➢ सहसंचालक नाशिक यांनी सुचविलेल्या बाबीचे अनुषंगाने नियोजन करण्यात येईल. | |
| ११ | राजीव गांधी प्रशासकीय गतीमानता अभियानात सहभाग | | सामान्य प्रशासन विभाग शासन संदर्भ दि.०३/०२/२०२१ नुसार राज्य / ६ सहसंचालक / मनपा सहसंचालक / ३४ सहायक संचालक/ ४ कृषी विद्यापीठांतर्गत, जिल्हा लेखापरीक्षक यांनी ४६ कार्यालयांनी जिल्हा / विभाग / राज्य स्तरावर जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्ताकडे प्रस्ताव नोंदणी करावी २७/०९/२०२२ पर्यंत यापूर्वीच परिपत्रकाद्वारे काम प्रगतीत आहे. त्यानुषंगाने (१ ते ७) प्रकारच्या सुधारणांची कामे (काम करण्यापूर्वी / करताना / नंतर ) चे photograph / videos / Booklet तयार करावे व ०२ ऑक्टोंबर पर्यंत काम पूर्ण करावे व तसे संबधीत प्राधिकारी / संचालनालयास कळवावे. सर्व सहसंचालकांनी आपले अर्ं अधिनस्त जिल्हा / कृषी विद्यापीठ कामकाजाचा वेळावेळी आढावा घ्यावा व अंतीम अहवाल प्रस्ताव सादर करुन एक प्रत संचालनालयास दि.१०/१०/२०२२ पर्यंत सादर करावी जी माहिती संदर्भ वित्त मंत्री / प्रधान सचिव यांना " सुशासन संदर्भ म्हणून " एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून दि.२०/१०/२०२२ ला सादर करण्यात येईल. | |
| १२ | लेखापरीक्षणाच्या नियोजनाप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखापरीक्षण करण्यापुर्वी पहिले तीन दिवस त्या संस्थेच्या वसुलपात्र रकमांच्या प्रलंबित परिच्छेदांची | | ➢ लेखापरीक्षण कालावधीत किमान ५० परिच्छेदांचे अनुपालनाची तपासणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. ५० परिच्छेदांच्या अनुपालन पडताळणीसाठी ०१ श्रमदिन वापरण्यात यावा.<br>➢ प्रत्येक विभागात किती प्रलंबित परिच्छेदाचे अनुपालन प्राप्त होते याबाबत सर्व विभागीय सहसंचालकांनी माहिती घ्यावी. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अनुपालन तपासणी करणेबाबत. | | ➢ नगरपालिका व नगरपंचायतींचे सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंतचे अनुपालने सादर करणेसाठी ८ दिवसांचा कालावधी द्यावा.<br>➢ सहायक संचालक यांचे स्तरावर प्रलंबित परिच्छेदांबाबत शिबिरांचे आयोजन करुन प्रलंबित परिच्छेद त्वरित निपटारा करण्याची कार्यवाही करावी. | |
| १३ | पंचायत राज समितीचे जिल्हा परिषद व पंचायत समितीचे परिच्छेदांबाबत | | जिल्हा परिषदेच्या ज्या वर्षाच्या साक्षीचे कामकाज पूर्ण झाले आहे. त्या वर्षापर्यंतच्या प्रलंबित परिच्छेदांच्या अनुपालन पडताळणीचे काम विशेष शिबिरंचे आयोजन करुन पूर्ण करावे. | |

(राजश्री टोकळ)
सह संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
नवी मुंबई